मातृभाषा मराठी असलेल्या राजपत्रित अधिका-यांना आणि अराजपत्रित कर्मचा-यांना मराठी भाषा परीक्षेतून सूट देण्याबाबत---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-मभाप-१०९२/१०४५/प्र.क्र.९८-९२/२०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ३ सप्टेंबर, १९९२.

परिपत्रक :-

शासन सेवेतील अमराठी भाषिक राजपत्रित अधिका-यांसाठी व अराजपत्रित कर्मचा-यांसाठी एतदर्थ मंडळातर्फे घेण्यात येणा-या मराठी भाषा परीक्षेची सुधारित नियमावली शासन निर्णय, क्र. मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३० डिसेंबर, १९८७ सोबतच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यांत आता पुढील प्रमाणे सुधारणा करण्याचे शासनाने ठरविले आहे.

२. ज्या अधिका-यांची/कर्मचा-यांची मातृभाषा मराठी आहे त्याना नियमावलीतील नियम क्र.४ [१] तीन अन्वये देण्यांत येणारी सूट ही त्यांना शासन सेवेत भरती होण्याच्या दिनांकापासून देण्यात यावी. तसेच सुधारित नियमावली नियम क्र.४ [१] चार च्या तरतुदींना अधीन राहून ज्या अधिका-यांनी/कर्मचा-यांनी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाची परीक्षा १०० गुणाचा मराठी उच्चस्तरीय विषय घेऊन उत्तीर्ण केली असेल त्यांना ही सूट ज्या दिनांकाला संबंधीत परिक्षा संपली असेल त्या दिनांकापासून किंवा सेवेत भरती झालेल्या दिनांकापासून यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून देण्यांत येत आहे. त्यासाठी त्यासंबंधीचा पुरावा पडताळून सर्व विभागाध्यक्षांनी/कार्यालय प्रमुखांनी आवश्यक ते प्रमाणपत्र उपरोक्त नियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ३० डिसेंबर, १९८७ पासून उद्भवणा-या प्रकरणाबाबत संबंधितांना द्यावे व त्याची प्रत संबंधित लेखा कार्यालयाकडे अभिलेखासाठी पाठवावी.

३. सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुखांनी वरील आदेश लक्षात घेऊन त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ अ. क. आम्बेरकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,